

श्री.जयदिप डाकरे सर श्री.प्रविण डाकरे सर

# माझा अभ्यास

Study From Home

गुरुमाऊली
एक शैक्षणिक व्यासपीठ

Subscribe

इयत्ता – पाचवी (17 जून) विषय – मराठी

Subscribe

# शाळापूर्व तयारी – उपचारात्मक ब्रीज कोर्स (15 ते 30 जून)

**मागील इयत्तेच्या अध्ययन निष्पत्तीवर आधारित अभ्यासक्रम समाविष्ट**

टेस्ट सोडवा

- खालील मुद्द्यावरून कथा वहीत लिहा.

**आम्ही कथा लिहितो – १**

खालील मुद्द्यांच्या आधारे कथा पूर्ण करा. यातली गंमत म्हणजे प्रत्येकाला स्वतःच्या मनासारखी कथा तयार करता येईल. कथा तयार करा आणि वर्गात सगळ्यांना ऐकवा. तयार केलेल्या कथेला शीर्षक द्या.


**मुद्दे :** घनदाट जंगल – वाघ आणि त्याचं पिल्लू – पिल्लू बोलत नाही – बोलायला शिकवण्यासाठी मांजरीची नेमणूक – म्याँव, म्याँव शिकवण्याचा प्रयत्न – वाघोबा वैतागतो – आता शिकवायला गाढवदादा येतात – ते खिंकाळायला सुरुवात करतात – पुन्हा वाघोबाचा वैताग आणि पिल्लू हैराण – तिसऱ्या वेळी बैलाची नेमणूक – वाघोबाचा वैताग वाढतो – एक दिवस पिल्लू जंगलात फिरते – दबा धरून बसलेला शिकारी – पिल्लावर बंदुकीचा नेम धरतो – पिल्लू डरकाळी – शिकारी धूम ठोकतो – वाघोबा खूश.





## अक्षरी संख्या अंकात लिहा.


टेस्ट सोडवा


◆ प्रतीके पाहा. संख्या लिहा व वाचा.


(१)



(२)



(३)



(४)



(५)



(६)



### अक्षरी संख्येचे अंकांत लेखन

(१) चार हजार अठ्ठावीस : ४०२८

हजाराच्या घरात ४ लिहिले. मग शतक, दशक व एककाच्या घरातही अंक लिहिले पाहिजेत. दिलेल्या संख्येत शतक नाहीत, म्हणून त्या घरात शून्य लिहिला. अठ्ठावीसमध्ये २ दशक व ८ एकक आहेत, म्हणून दशकाच्या घरात २ व एककाच्या घरात ८ लिहिले.

(२) पाच हजार तीनशे नऊ : ५३०९

या संख्येत हजाराच्या घरात ५, शतकाच्या घरात ३ आहेत. दशक नाहीत म्हणून दशकाच्या घरात 0 लिहिले. एककाच्या घरात ९ लिहिले.

> चार अंकी संख्या लिहिताना प्रथम हजाराच्या स्थानातील अंक लिहून नंतर क्रमाने शतक, दशक व एककाच्या स्थानात 0 ते ९ पैकी योग्य अंक लिहावा.

### स्वाध्याय

१. दिलेल्या संख्या अंकांत लिहा.


| संख्या (अक्षरांत) | ह | श | द | ए |
|---|---|---|---|---|
| (१) चार हजार पाच | | | | |
| (२) पाच हजार सतरा | | | | |
| (३) सात हजार तीनशे तेरा | | | | |
| (४) आठ हजार | | | | |
| (५) नऊ हजार नऊशे नव्याण्णव | | | | |

टेस्ट सोडवा


## Write the alphabetical numbers in digits.

◆ **Look at the symbols. Write the number and read it.**


(1)





(2)





(3)





(4)




(5)




(6)




### Numbers in words and figures

**1. Four thousand and twenty-eight : 4028**

Write 4 in the thousands place. Now, we must write the digits in the hundreds, tens and units places, too. The given number has no hundreds. So, we write a zero in the hundreds place. Twenty-eight has 2 tens and 8 units. So we write 2 in the tens place and 8 in the units place.

**2. Five thousand three hundred and nine : 5309**

In this number, there is 5 in the thousands place and 3 in the hundreds place. There are no tens, so we write 0 in the tens place. We write 9 in the units place.

**When writing a four-digit number in figures, we first write the digit in the thousands place. Then, we write the proper digit from 0 to 9 in the hundreds, tens and units places in that order.**

**Exercise**

1. Write the given numbers in figures.

| Number in words | Th | H | T | U |
|---|---|---|---|---|
| (1) Four thousand and five | | | | |
| (2) Five thousand and seventeen | | | | |
| (3) Seven thousand three hundred and thirteen | | | | |
| (4) Eight thousand | | | | |
| (5) Nine thousand nine hundred and ninety-nine | | | | |

Read the words and answer the following questions.
(शब्द वाचा आणि खालील प्रश्नांची उत्तरे द्या.)

टेस्ट सोडवा

## A GARDEN OF WORDS

| | | | | |
|---|---|---|---|---|
| a | easily | many | said | time |
| and | five | more | shall | to |
| at | gave | not | she | too |
| began | hand | now | smile | took |
| but | her | of | smiled | two |
| came | I | one | some | wanted |
| come | in | only | take | was |
| could | it | out | ten | what |
| cry | liked | put | the | will |
| do | looked | quickly | there | would |

**1. Listen carefully and tick off the words in your chart.**

* and * but * one * five * ten * will * liked
* took * cry * it * do * put * there * now

**2. Find all the three-letter words and copy them in your notebook.**

**3. Read the word. From any poem, say a line that has the word.**

**Example :** began : And they began to cry.

* and * her * one * some * will

वरील तक्त्यातील प्रत्येक शब्दासाठी 8 x 4 cm किंवा अन्य आकारात जाड कागदाची कार्डे प्रत्येक मुलाकडून करून घ्यावीत. ती मुलांजवळच ठेवावीत. इंग्रजीच्या तासाव्यतिरिक्त एरवीही गटात किंवा एकट्याने खेळण्याजोगे अनेक सोपे खेळ या कार्डांच्या मदतीने घेता येतील. प्रत्येक मुलाला चांगल्या प्रकारे स्वतः लिहिलेला शब्द वारंवार व वेगवेगळ्या संदर्भात हाताळायला मिळणे महत्त्वाचे आहे. कार्डांवरील शब्द चार रेघांत लिहिण्याची आवश्यकता नाही.

• तक्त्यातील व कार्डांवरील शब्द मुलांकडून वाचून घ्यावे. **1.** शिक्षकांनी पुस्तकात दिलेल्या क्रमापेक्षा वेगळ्या क्रमाने सावकाश एकेक शब्द सांगावा. मुलांनी आपल्या पुस्तकात/कार्डांमधून तो शब्द शोधावा. **3.** मुले जे शब्द तोंडी शिकली, त्यांची लेखन-वाचनात **योग्य त्या संदर्भासह उजळणी** व्हावी असा या स्वाध्यायाचा हेतू आहे. शब्द ऐकून किंवा कार्डावरील शब्द पाहून मुलांनी कोणत्याही कवितेतील तो शब्द असणारी ओळ म्हटली तरी चालेल. (त्यासाठी शिक्षकांनी तिसरीपर्यंत झालेल्या सर्व कविता माहीत करून घेणे आवश्यक आहे.) मुलांचे गट/जोड्या करून नंतरही या स्वाध्यायाचा **नियमित वापर करावा.**

खालील उतारा वाच व समजून घे. टेस्ट सोडव.

टेस्ट सोडवा

## पिण्यासाठी निर्धोक पाणी

पिण्याचे पाणी निर्धोक असायला हवे. शुद्ध पाण्याला चव नसते, रंग नसतो किंवा वास नसतो. पाण्याला रंग दिसू लागला किंवा दुर्गंधी येऊ लागली, तर ते पाणी पिऊ नये. असे पाणी प्यायल्याने माणसे आजारी पडू शकतात.

पावसाळ्यातले गढूळ पाणी आपण निवळून घेतो. गरज असेल तर त्यात तुरटी फिरवतो किंवा गाळून घेतो. त्यामुळे पाण्याचा गढूळपणा कमी होतो. पाणी स्वच्छ व पारदर्शक दिसू लागते. म्हणजे ते निर्धोक झाले का ?

याविषयी आपण अधिक माहिती घेऊ.

**नवीन शब्द शिका**

**सूक्ष्म :** खूप लहान आकाराचे आपल्याला डोळ्यांनी दिसू शकणार नाही किंवा काचेच्या भिंगातूनही दिसू शकणार नाही इतका लहान.

**सूक्ष्मजीव :** आकाराने सूक्ष्म असणारे सजीव.

**सूक्ष्मदर्शी :** मोठमोठ्या प्रयोगशाळांमध्ये सूक्ष्म वस्तू पाहण्यासाठी असणारे साधन.

## माहीत आहे का तुम्हांला

कणभर दही किंवा थेंबभर ताक घेऊन ते काचेच्या पट्टीवर ठेवले. ती पट्टी सूक्ष्मदर्शीतून पाहिली तर आपल्याला त्यात सूक्ष्म आकाराचे सजीव दिसतात.

हे सूक्ष्म सजीव दुधाचे रूपांतर दह्यात करतात. ते आपल्याला उपयोगी असतात.

पण सर्वच सूक्ष्मजीव उपयोगी नसतात. काही सूक्ष्मजीव शरीरात गेले, तर आपल्याला आजार होऊ शकतात. अशा सूक्ष्मजीवांना अपायकारक सूक्ष्मजीव म्हणतात.



- मुलांनो.. हा मुलगा तुम्हाला काहीतरी सांगत आहे. त्याचे जरूर ऐका बरं..

(व्हिडिओ पाहण्यासाठी चित्राला क्लिक करा.)




## घरी रहा...! सुरक्षित रहा...!



| माझा ऑनलाईन अभ्यास – प्रत्येक घटकाच्या टेस्ट सोडवा खालील लिंकवरून | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| पाचवी मराठी | पाचवी गणित | सेमी गणित | पाचवी इंग्रजी | पाचवी प.अ-1 | पाचवी प.अ-2 | हिंदी |
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक |

| दररोजच्या माझा अभ्यास pdf तुम्हाला खालील लिंकवर मिळतील. | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

| इतर इयत्तांच्या ऑनलाईन टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन... | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

निर्मिती - श्री.प्रविण डाकरे, श्री.जयदिप डाकरे    वेब स्त्रोत-'ई-बालभारती'    सौजन्य- जिल्हा परिषद कोल्हापूर

https://www.gurumauli.in